**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या दशकभरात भारत एक जागतिक आर्थिक शक्ती म्हणून उदयाला आला असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांचं दावोस परिषदेत प्रतिपादन

- तिसरी मुंबई आणि रायगड जिल्हा परिसरातल्या विविध प्रकल्पांसाठी महाराष्ट्र सरकारचे सामंजस्य करार

- महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत जाहीर, मुंबईसह १७ महानगरपालिकांमधे खुल्या प्रवर्गातला महापौर

**आणि**

- पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

गेल्या दशकभरात भारत एक जागतिक आर्थिक शक्ती म्हणून उदयाला आला आहे, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी सांगितलं. ते दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत आयोजित सत्रात काल बोलत होते. भारत आता उदयोन्मुख अर्थव्यवस्था राहिला नसून जागतिक अर्थव्यवस्थेचा

महत्त्वाचा भाग बनला आहे, असं नायडू म्हणाले. भारताचा विकास व्यापक पायावर आधारित, डिजिटली सक्षम, पायाभूत सुविधांनी सुसज्ज आणि सर्वसमावेशक आहे, डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेतला महत्त्वाचा बदल आहे, असं नायडू यांनी नमूद केलं.

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या परिषदेत बोलताना जागतिक गुंतवणूकदारांना स्वच्छ ऊर्जा वापराच्या प्रसारासाठी भारतासोबत भागीदारी करण्याचं आवाहन केलं.

<><><><><>

महाराष्ट्र सरकारच्या वतीनं मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रायगड जिल्ह्यातल्या पेण तालुक्यात विकास केंद्र उभारण्यासाठी काल दावोस इथं विविध जागतिक कंपन्यांसमवेत सामंजस्य करार केले. तिसरी मुंबई म्हणून संकल्पित असलेला हा प्रकल्प, तंत्रज्ञान, अर्थतंत्र आणि डेटा सेंटरसाठी अत्याधुनिक केंद्र म्हणून उदयास येणार आहे. रायगड जिल्हा हा भारताचा पहिला समर्पित जागतिक क्षमता केंद्र म्हणून ओळखला जाणार आहे. जागतिक कंपन्यांनी या विकास केंद्राला गुंतवणूक आणि प्रमुख व्यवसाय म्हणून विचारात घेण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

मुंबई विमानतळाजवळ अत्याधुनिक नवोन्मेष शहर म्हणजेच इनोव्हेशन सिटी विकसित करण्याची घोषणाही यावेळी फडणवीस यांनी केली. या प्रकल्पासाठी टाटा समूह ११ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. स्टार्टअप समुदायाला पाठिंबा देण्यासाठी विशेष तयार करण्यात आलेली प्लग अँड प्ले ही परिसंस्था उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचेही फडणवीस यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ग्रीनलँडवर नियंत्रणासाठी बळाचा वापर करणार नसल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे मात्र आर्क्टिक बेटाची मालकी वॉशिंग्टनकडे द्यावी या मागणीचा त्यांनी पुनरूच्चार केला आहे. दावोसमध्ये आर्थिक मंचाच्या परिषदेला संबोधित करताना ग्रीनलँडच्या अधिग्रहणासंदर्भात चर्चा करण्यासाठी तातडीने वाटाघाटी करू इच्छित असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रीनलँड हा डेन्मार्कचा अर्धस्वायत्त प्रदेश आहे. ग्रीनलँडने मात्र अमेरिकेचा भाग होण्याची इच्छा नसल्याचे म्हटले आहे. मात्र या बेटावर आधीपासूनच एक लष्करी तळ आहे.

दरम्यान, ग्रीनलँडवरील अमेरिकेच्या नियंत्रणाच्या मुद्द्यावरून युरोपमधील अमेरिकेच्या मित्र देशांवर लावण्यात

येणारे नियोजित निर्यात शुल्क रद्द करत असल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. ग्रीनलँडवर मालकी हक्क मिळवण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर काहीच तासांत हा निर्णय घेण्यात आला. यासाठी बळाचा वापर करणार नाही असे सांगतानाच युरोपिय मित्रराष्ट्रांविषयी उपहास व्यक्त करतानाच नाटोने अमेरिकेच्या विस्तारवादाला रोखण्याचा प्रयत्न करू नयेही असेही आपल्या दावोस इथल्या भाषणात म्हटलं आहे.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची पुनर्रचना करण्यासाठी जी फोर देशांनी एक प्रारूप सादर केलं आहे. सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्यास विलंब झाला तर लोकांना अधिक समस्यांना सामोरं जावं लागेल असं जी फोर देशांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतल्या सुधारणांविषयी काल न्यूयॉर्क इथं आंतर सरकारी वाटाघाटी झाल्या, यात भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरिश यांनी जी फोर देशांच्या वतीने बाजू मांडली. भारत, ब्राझील, जर्मनी आणि जपान या देशांचा जी फोर देशांमधे समावेश होतो. जगभरातल्या संघर्षामुळे रोज हजारो जणांचा प्राण जात आहेत, जगाने एकत्र येऊन यावर उपाय करायला हवा असं हरिश म्हणाले. वाढत्या संघर्षामुळे संयुक्त राष्ट्राच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण

झालं आहे. सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या २५ किंवा २६ करावी, त्यात सहा जागा कायमस्वरूपी कराव्यात असं हरिश म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत आज मुंबईत मंत्रालयात जाहीर झाली.ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

- - होल्ड- व्हॉईस कास्ट- - -

*(राज्यातल्या २९ महानगरपालिकाच्या महापौरपदासाठीची सोडत आज मुंबईत मंत्रालयात निघाली. त्यानुसार १७ महानगरपालिकांमधे खुल्या प्रवर्गातले उमेदवार महापौर होतील. त्यात मुंबई, नवी मुंबई, पुणे, वसई विरार, मीरा भाईंदर, नाशिक, धुळे,मालेगाव, भिवंडी निजामपूर, पिंपरी चिंचवड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड वाघळा, सोलापूर, सांगली मरज कुपवाड आणि अमरावती महानगरपालिकांचा समावेश आहे.*

*ठाणे, जालना, आणि लातूर महानगरपालिकेत अनुसूचित जातींसाठी तर कल्याण डोंबिवलीत अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी महापौरपद आरक्षित झालं आहे.*

*पनवेल, उल्हासनगर, जळगाव, इचलकरंजी, कोल्हापूर, अकोला, चंद्रपूर, अहिल्यानगर या ठिकाणी  इतर मागासवर्गीय उमेदवार महापौरपदावर असेल.)*

दरम्यान, १२  जिल्हापरिषदांमधल्या मिळून १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होत आहे. छाननी झाल्यावर वैध उमेदवारांची यादी जाहीर होईल. उद्या आणि परवा तसंच येत्या मंगळवारी म्हणजे २३, २४ आणि २७ तारखेला दुपारी ११ ते ३ या वेळात उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. उमेदवारांची अंतिम यादी आणि चिन्ह वाटप २७ जानेवारीला दुपारी साडेतीननंतर प्रसिद्ध होईल.  येत्या ५ फेब्रुवारीला मतदान तर मतमोजणी ७ फेब्रुवारीला होईल.

**<><><><><>**

बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाला ११ वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर विशेष संदेश लिहिला आहे. देशाच्या लेकी वेगवेगळ्या आघाड्यांवर प्रगतीचे नवे उच्चांक प्रस्थापित करत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती भवनाच्या परिसरातलं ऐतिहासिक अमृत उद्यान येत्या ३ फेब्रुवारीपासून सर्वसामान्य जनतेला पाहण्यासाठी खुलं करण्यात येणार आहे. ३१ मार्चपर्यंत हे उद्यान सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत खुलं राहिल. हे उद्यान ४ मार्च रोजी होणाऱ्या होळीनिमित्त बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

<><><><><>

पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन या दोघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेननं पुरुष एकेरी गटात हाँगकाँग चीनच्या जेसन गुनावान याला २१-१०, २१-११ असं नमवलं तर महिला एकेरीमध्ये दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूनं डेन्मार्कच्या होजमार्क कजेरफेल्ड्ट चा २१-१९, २१-१८ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा मुकाबला आता चीनची चेन यू फेई हिच्याशी होणार आहे.

<><><><><>

रणजी क्रिकेट स्पर्धेचा दुसरा टप्पा आज हैद्राबादच्या राजीव गांधी मैदानात आज सुरु झाला. मुंबई विरुद्ध हैद्राबाद असा हा सामना असून, हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण

करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना उपाहारापर्यंत मुंबईच्या २ बाद ७९ धावा झाल्या आहेत. मुशीर खान ९ तर कर्णधार सिद्धेश लाड ७ धावांवर खेळत आहे.

**<><><><><>**

झारखंडमधल्या पश्चिम सिंगभूम जिल्ह्यामधल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलींमधे चकमक झाली. सुरक्षा दलाकडून या परिसरात शोधमोहीम सुरू असताना या चकमकीला सुरुवात झाली. यात काही नक्षली मारले गेल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यानंतर बाकीचे नक्षली जंगलात आणि डोंगराळ भागात पळून जाण्यात यशस्वी झाले. सुरक्षा दलाचे जवान त्यांच्या मागावर गेले आहेत.

**<><><><><>**

हवामान बदलाच्या या युगात हवामानाशी संबंधित अचूक तपशील मिळवण्याची गरज असून त्यादृष्टीनं सुयोग्य अशी अत्याधुनिक उपकरणं वापरली जावीत, असं जल शक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही एल कांता राव यांनी आज सांगितलं. पुणे इथे प्रिसि - सेन्स २०२६ या राष्ट्रीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत

होते. अशा प्रकारची मोजमाप करणारी जागतिक दर्जाची उपकरणं देशात तयार होण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

जागतिक कीर्तीचे ख्यातनाम ढोलकीवादक राजाभाऊ जामसंडेकर यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. उस्ताद झाकिर हुसेन, पंडित भवानी शंकर यांसारख्या कलाकारांसोबत जुगलबंदी वादन करणाऱ्या राजाभाऊंनी हिंदी-मराठी सिनेसृष्टीतल्या अनेक संगीतकारांसोबतही काम केलं.

लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या लोकसंगीताच्या कार्यक्रमात ते प्रदीर्घकाळ ढोलकीवादक म्हणून जोडलेले होते.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात पश्चिमेकडच्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे उत्तरेकडच्या थंड वाऱ्यांना काहीसा पायबंद बसला आहे. हिमाचल प्रदेशात हवामान कोरडं असून मोसमातल्या पहिल्या हिमवृष्टीची प्रतीक्षा पर्यटक करीत आहेत. पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे जम्मू काश्मीर आणि लडाखमधे कडाक्याची थंडी आहे.

//<><><><><>//